शिष्यवृत्ती हमीपत्र [UNDETAKING :- 2]

DIPLOMA

मी, श्री/सौ...संजिता...शामराव...शेवाळे..... वय ..36...
राहणार ...विटा..... ता ..खानापूर. जि. ....सांगली.... असे प्रतिज्ञापूर्वक लिहुन ~~देतो~~/देते की, ~~माझा~~/माझी पाल्य ...राजनंदिनी...शामराव...शेवाळे.... नाते ...मुलगी.... वय ..19.
राहणार ...विटा..... ता. खानापूर.. जि. सांगली.. माझा मोबाईल नं. 7387710916... हा आहे. माझे पाल्याने आपल्यां आदर्श इन्स्टिटययुट ऑफ टेक्नॉलॉजी पॉलीटेक्नीक विटा, ता.खानापूर, जि.सांगली ४१५३११ या पदविका अभ्यासक्रमास महाविद्यालयात शासकीय कोटयातुन (CAP मधून) प्रवेश घेतला असुन मला महाविद्यालयाच्या खालील सर्व शिष्यवृत्तीच्या (स्कॉलरशिप) सर्व अटी विनाशर्त मान्य आहेत.

१. मी आपल्या महाविद्यालयात शासकीय प्रवेश प्रकियेतून मागासवर्गीय प्रवर्ग/खुला प्रवर्ग यामधून प्रवेश घेतलेला असून मला ईबीसी/शिष्यवृत्ती अर्ज भरणे आवश्यक असून त्यासाठी आवश्यक कागदपत्रे मी महाविद्यालयाच्या सूचनेनुसार विहित मुदतीत महाविद्यालयात सादर करेन.

२. महाराष्ट्र शासन निर्णयानुसार

- ईबीसी साठी – संकीर्ण–२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि–४ दि. ०७/१०/२०१७,
- अनुसूचित जातीसाठी –भासशी–२०२१/प्र.क्र.१५६/शिक्षण–१ दि. मार्च, २०२१
- इमाव/विमाव/विभा/भज–शिवृत्ती–२०२३/प्र.क्र.८३/शिक्षण दि.२०/०६/२०२५

माझ्या पाल्यास प्राप्त झालेली शिष्यवृत्ती रक्कम जर माझ्या पाल्याने प्रवेश रद्द केला अथवा शैक्षणिक अभ्यासक्रम अर्धवट सोडला अथवा शासनाचे परवानगीने महाविद्यालय बदलले अशा परिस्थितीत त्या अभ्यासक्रमास घेतलेली शिष्यवृत्ती तात्काळ राज्य शासनास जमा करणे बंधनकारक असून ते मला मान्य असून सदर शिष्यवृत्ती रक्कम मी शासनास परत केले नंतरच माझा प्रवेश रद्द केला जाईल हे मला मान्य आहे व त्याबाबत माझी महाविद्यालयाविषयी कोणतीही तक्रार व हरकत राहणार नाही.

३. माझ्या पाल्याचा प्रवेश शासकीय कोटयातुन (CAP मधून) झाला असून मी माझा मागील (३१ मार्च, ...) शैक्षणिक वर्षाचा शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असणारा अद्यावत उत्पन्नाचा दाखला शैक्षणिक वर्ष ..... च्या प्रवेशावेळी प्रवेश अर्ज सोबत महाविद्यालयात सादर करेन. सदरचा उत्पन्नाचा दाखला वडिलांच्याच नावाचा जमा करेन, वडिल हयात नसतील तर आईचा उत्पन्नाचा दाखला जमा करेन.

४. शासन निर्णयांचा २०१७ – १८ पासून पहिल्या दोन अपत्यांना शासनाच्या सवलती लागू असून मी महाविद्यालयात सत्य स्वयंघोषणापत्र जमा करेन. तथापि मुलींच्या बाबत हा निकष लागू राहणार नाही.

५. माझ्या पाल्यास प्राप्त होणारी शिष्यवृत्ती ही राष्ट्रीयकृत बॅकेत जमा होणे आवश्यक असून त्यासाठी अद्यावत आधार लिंक बॅक खाते मी शिष्यवृत्ती अर्जासोबत सादर करेन. तसेच वेळोवेळी बॅक खाते आधार लिंक आहे याची खातर जमा करेन. सदर कारणास्तव शिष्यवृत्ती प्राप्त होण्यास विलंब झाल्यास शैक्षणिक अंतिम वर्षात महाविद्यालयाकडून ना–हरकत प्रमाणपत्र व महाविद्यालय सोडलेचा दाखला प्राप्त करतेवेळेसे पूर्ण प्रलंबित शिष्यवृत्ती रक्कम महाविद्यालयास जमा करेन.

६. अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार शिष्यवृत्ती मध्ये केंद्रशासन ६०% व राज्य शासन ४०% शिष्यवृत्ती देते. सदर केंद्र शासन देत असलेली ६०% शिष्यवृत्ती रक्कम माझे खात्यावर जमा झाल्यानंतर सात दिवसात जमा करण्यास बांधील असेन.

७. शासन निर्णयानुसार OPEN/SEBC/EWS प्रवर्गातील विद्यार्थी व विद्यार्थिनी साठी शासनाकडून डॉ. पंजाबराव देशमुख वस्तीगृह निर्वाह भत्ता दिला जातो. सदर योजनेसाठी महाविद्यालय व विद्यार्थी राहत असलेले ठिकाण मधील अंतर किमान २० किलोमीटर असणे आवश्यक आहे. याची मला पूर्ण कल्पना आहे व यानुसारच मी सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र असेन या विषयी माझी कुठलीही तकार नाही

८. विद्यार्थ्याची प्रत्येक शैक्षणिक वर्षातील प्रत्येक सत्राची उपस्थिती किमान ७५% असणे आवश्यक आहे, तसेच प्रत्येक सत्राचा परिक्षा अर्ज भरणे व परिक्षेस उपस्थित असणे बंधनकारक आहे.

९. एका शासन शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या विदयार्थ्यास व विदयार्थीनीस अन्य शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही.

१०.प्रत्येक शासन शिष्यवृत्ती योजनेच्या लाभासाठी डोमिसिअल, नॉन क्रिमीलेअर, जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र व रेशन कार्ड (लागू असलेल्या अभ्यासक्रमा करिता) आवश्यक आहे. याची मला पूर्ण कल्पना आहे. सदरची सर्व कागदपत्रे महाविद्यालयाने दिलेल्या विहित मुदतीत सादर करेन.

११.शासन शिष्यवृत्ती योजनेचा लाभ राज्य शासनाच्या अथवा तत्सम प्राधिकृत यंत्रणेच्या केवळ केंदीभूत प्रवेश प्रकियेद्वारेच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहील. व्यवस्थापन कोटा (Managemant) अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देय राहणार नाही. (अनुसूचित जाती प्रवर्ग वगळून)

१२.पात्र लाभार्थी विद्यार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमासच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णतः अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसेल तर संबंधित विद्यार्थी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमासच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेंतर्गत लाभाकरिता कायम स्वरूपी अपात्र ठरेल. पदविका(डी.फार्म) अभ्यासक्रम ३ वर्षासाठी पदवी (बी.फार्म) अभ्यासक्रम ५ वर्षासाठी व पदव्युत्तर पदवी (एम .फार्म) अभ्यासक्रम ३ वर्षासाठी बंधनकारक आहे.

वर नमूद केलेल्या व वेळोवेळी देणात येणार्या सुचनांचे मी व माझ्या पाल्यांकडून पालन न झाल्यास महाविद्यालयाकडून करण्यात येणारी दंडात्मक/शैक्षणिक कारवाई मला मंजुर असेल. याबदद्ल माझी व माझ्या पाल्याची कोणत्याही प्रकारची हरकत व तक्रार राहणार नाही.

विद्यार्थ्याचे नाव .....सही .....

पालकाचे नाव .....सही .....